ePaper
केजरीवाल गड राखणार की भाजप सुरुंग लावणार? दिल्ली विधानसभा निकालाचं काउंटडाऊन सुरू

वर्ष - 8 । अंक - 204 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 8 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- या सर्व गोष्टींकडे लक्ष देत नाही!
- रोहितला सूर गवसला तर
- बहिणींसाठी ठाकरेंनी उठवला आवाज
- पंतप्रधान मोदींचा अमेरिका दौरा ठरला

## अपात्र 'लाडक्या बहिणी'मुळे साडेचारशे कोटींचा फटका

# पाच लाख बहिणी अपात्र!

### निकषांचे उल्लंघन करणाऱ्या पाच लाख लाभार्थी बाद

। मुंबई ।महाईन्यूज

**महत्त्वाकांक्षी अशा 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतील निकषांचे उल्लंघन करीत गैरफायदा घेतलेल्या पाच लाख बहिणींना सरकारने अपात्र ठरविले आहे. त्यांच्याकडून सहा महिन्यांच्या अनुदानाची नऊ हजार रुपयांची रक्कम वसूल केली जाणार नाही असे स्पष्ट करण्यात आले.**



विविध सरकारी योजनांचा लाभ घेणाऱ्या किंवा चार चाकी वाहने असलेल्या पाच लाख महिलांना 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतून वगळण्यात आल्याची घोषणा महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी केली. निवडणुकीच्या तोंडावर कोणतीही छाननी न करता आलेले अर्ज स्वीकृत करण्यात आले होते. या योजनेअंतर्गत दरमहा १५०० रुपयांचे अनुदान पात्र महिलांना दिले जाते. आतापर्यंत सुमारे दीड लाख महिलांनी स्वेच्छेने या योजनेतून माघार घेतली आहे. सरकारच्या या योजनेला २ कोटी ६३ लाख लाडक्या बहिणींनी नोंदणी केली होती. त्यापैकी २ कोटी ४१ लाख महिला पात्र ठरल्या होत्या. अजूनही ११ लाख अर्जांची छाननी प्रलंबित असून ११ लाख अर्जांची आधारशी जोडणी प्रलंबित आहे.

**रक्कम वाढणार असल्यानेच कात्री?**

महायुतीने निवडणूक जाहीरनाम्यात हे अनुदान १५०० रुपयांवरून २१०० रुपये करण्याचे आश्वासन दिले होते. यानुसार अर्थसंकल्पात त्याची तरतूद केली जाईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यापूर्वी जाहीर केले आहे. सरकारची आर्थिक परिस्थिती आधीच गंभीर असताना दरमहा ६०० रुपये वाढ करण्यात आल्याने सरकारच्या तिजोरीवर आणखी बोजा पडणार आहे. यामुळेच अर्थसंकल्पापूर्वी घाईघाईत ५ लाख बहिणींना अपात्र ठरवून सरकारने बोजा कमी केला आहे.

#### शासनाची फसवणूक

पाच लाख बहिणी अपात्र ठरल्या असल्या तरी जुलै ते डिसेंबर या काळात देण्यात आलेल्या लाभाची रक्कम परत घेतली जाणार नाही, असे आदिती तटकरे यांनी स्पष्ट केले. या महिलांना जानेवारीपासून लाभाची रक्कम दिली जाणार नाही. परंतु आधी बँक खात्यात जमा केलेली रक्कम परत घेणे उचित ठरणार नाही, असेही तटकरे यांनी म्हटले आहे. यामुळे दरमहा १५०० रुपये याप्रमाणे जुलै ते डिसेंबर या सहा महिन्यांसाठी पाच लाख बहिणींनी देण्यात आलेली ४५० कोटींची शासनाची रक्कम पाण्यात गेली आहे.

## अनधिकृत आरओ प्लांट्स बंद करण्याचे आदेश!

### महापालिका प्रशासनाचा निर्णय: अनाधिकृत आरओ प्लांट अनिश्चित काळासाठी राहणार बंद

। पिंपरी- चिंचवड ।महाईन्यूज

**गुईलेन बेरे सिंड्रोमचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कठोर पाऊले उचलण्यास सुरूवात केली असून दूषित पाणी वापरून पाण्याची बॉटलिंग करणाऱ्या अनधिकृत खाजगी आरओ प्लांट्स चालकांना प्लांट तात्काळ बंद करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. शिवाय पाण्याची गुणवत्ता आणि बॉटलिंग प्रक्रियेचा सखोल आढावा व मूल्यांकन केल्यानंतरच त्यांना पुन्हा प्लांट चालू करण्याची परवानगी देण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.**




गुईलेन-बॅरे सिंड्रोम (GBS) प्रादुर्भाव व वाढत्या सार्वजनिक आरोग्यविषयक समस्यांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने खाजगी आरओ प्लांट्सच्या पाण्याच्या नमुन्यांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये अनधिकृत खाजगी आरो वॉटर ऑपरेटर्स दूषित पाणी वापरून पाण्याची बॉटलिंग करुन पुरवठा करत असल्याचे निदर्शनास आले होते. असे दूषित पाणी प्रामुख्याने बोअरवेल्स व उघड्या जलस्त्रोतांमध्ये आढळते. नागरिकांच्या सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी आणि भविष्यातील आरोग्यविषयक समस्या टाळण्यासाठी सध्या शहरात दूषित पिण्याचा पुरवठा करणाऱ्या अनधिकृत वॉटर बॉटलिंग आणि आर.ओ प्लांट्सवर तात्काळ कारवाई करणे आवश्यक आहे.

> "गुईलेन बेरे सिंड्रोमच्या पार्श्वभूमीवर आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने शहरातील नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित पाणी मिळावे, यासाठी अनधिकृतपणे दूषित पाण्याची बॉटलिंग करणाऱ्या आरओ प्लांट्सवर कठोर कारवाई केली जात आहे. पाणी हे आरोग्याचा मूलभूत घटक असल्याने त्याच्या गुणवत्तेचा सखोल आढावा घेतल्यानंतरच संबंधित प्लांट्सना परवानगी देण्यात येणार आहे.
>
> -**प्रमोद ओंभासे,** मुख्य अभियंता (१), पाणीपुरवठा विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

#### प्रभागनिहाय करण्यात येणार कारवाई

पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, प्लंबर आणि सुरक्षा रक्षक यांच्या समन्वयाने तसेच आरोग्य वैद्यकीय विभागाकडून परवान्याबाबत तपासणी करूनच या प्लांट्सच्या बंदीची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. आर.ओ प्रकल्प (प्लांट) बंद बाबतच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर वैद्यकीय विभागामार्फत कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

# पीएमपीला एक हजार बस मिळणार!

## अजित पवारांची समाविष्ट गावांसाठी मोठी घोषणा

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुण्यातील गुइलेन बॅरे सिंड्रोमचा (जीबीएस) उद्रेक आढळून आलेल्या सहा गावांमध्ये शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यासाठी जलशुद्धिकरण केंद्र बांधण्याचा निर्णय घेतला आहे. हा प्रकल्प ५०० कोटी रुपयांचा असून, राज्य सरकार आणि पुणे महापालिका हे त्यातील प्रत्येकी ५० टक्के खर्च करतील, अशी माहिती पालकमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी दिली.**



पश्चिम महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांच्या नियोजन समितीच्या बैठका आज पवार यांनी घेतल्या. पुणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सिंहगड रस्ता आणि परिसरातील पाच ते सहा गावांमध्ये झालेल्या 'जीबीएस' उद्रेकावर चर्चा झाली. या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना पवार म्हणाले की, केंद्र सरकारच्या अमृत योजनेत या गावांमध्ये जलशुद्धिकरण केंद्र उभारण्यासाठीचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. परंतु, तो मंजूर झाला नाही. त्यामुळे आता राज्य सरकार हा प्रकल्प उभारण्यासाठी निधी देणार आहे. हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांना शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याची जबाबदारी पुणे महापालिकेसोबत राज्य सरकारचीही आहे. त्यामुळे या जीबीएसचा जास्त प्रादुर्भाव असलेल्या सहा गावांत जलशुद्धिकरण केंद्र उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी पाचशे कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, त्यातील २५० कोटी रुपये खर्च राज्य सरकार करेल आणि उरलेले २५० कोटी रुपये पुणे महापालिकेला खर्च करावे लागतील.पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडच्या (पीएमपीएमएल) ताफ्यातील बस जुन्या आहेत. त्यामुळे त्या बंद पडण्याचे प्रकार वाढले आहेत. पीएमपीच्या ताफ्यात एक हजार नवीन बस घेण्याचा निर्णय झाला आहे. त्यासाठी पाचशे कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे.त्यात पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) २५० कोटी रुपये देणार असून, पुणे महापालिका १५० कोटी रुपये तर पिंपरी-चिंचवड महापालिका १०० कोटी रुपये खर्च देणार आहे. या सर्व ई-बस घेण्याचा विचार होता परंतु, प्रत्यक्षात या बस येण्यास खूप वेळ जातो. त्यामुळे सीएनजीवरील बस घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असेही पवार यांनी सांगितले.लाडकी बहीण योजना लागू करताना अडीच लाख रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या महिलांना लाभ द्यायचा होता. तेव्हा नियम तपासण्यासाठी वेळ मिळाला नाही. आता तपासणी करून अपात्र महिलांचा लाभ बंद केला जाईल. मात्र, यापूर्वी लाभ घेतलेल्या महिलांचे पैसे परत घेण्यात येणार नाहीत, असे पालकमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी स्पष्ट केले. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर बोलताना पवार म्हणाले की, लाडकी बहीण योजना जूनमध्ये जाहीर केली. या योजनेचे पैसे ऑगस्टनंतर देण्यास सुरुवात करून नोव्हेंबरपर्यंत पाच महिन्यांचे पैसे दिले. चारचाकी, वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त आणि संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेत असलेल्या महिलांना योजनेचा लाभ बंद करणार आहेत. लाभार्थींनी एकाच योजनेचा लाभ घ्यावा.

### राज ठाकरेंना टोला

अशी सरकारची भूमिका आहे. राज्यात श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, लाडकी बहीण योजनांपैकी एकाच योजनेचा लाभ घ्यावा.सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांनी कृषिमंत्री असताना नियम डावलून खरेदी केल्याचे पुरावे दिले आहेत, याबाबत विचारणा केली असता पवार म्हणाले की, अन्न व नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे यांच्यावर अंजली दमानिया यांनी आरोप केले आहेत. दमानिया यांच्या आरोपात तथ्य नाही. आरोपात तथ्य असेल तर चौकशी होईल. दमानियांनी कोणतेही पुरावे दिलेले नाहीत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाला कमी जागा मिळायला हव्यात, असे विधान केले होते. यावर पवार म्हणाले की, तुम्हाला तुमच्या मुलाला निवडून आणता आले नाही आणि तुम्ही आम्हाला गप्पा मारता. विधानसभेला आम्ही कष्ट केल्यामुळे आमचे जास्त आमदार निवडून आले. मला लोकसभेच्या एका निवडणुकीत मुलाला आणि दुसऱ्या निवडणुकीत पत्नीला निवडून आणता आले नाही.

---

# महावितरणच्या क्रीडास्पर्धेत कुस्त्यांचा थरार

## पुणे-बारामतीला 10 पैकी 6 सुवर्णपदके तर कोल्हापूरला 2 सुवर्ण

।पुणे ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महावितरणमध्ये कार्यरत कुस्तीपटू कर्मचाऱ्यांनी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत विविध डावपेच अन् ताकदीचा अनोखा संगम सादर केल्याने कुस्तीप्रेमी प्रेक्षकांना थरार अनुभवता आला. या रंगलेल्या कुस्त्यांमध्ये पुणे-बारामती संघाच्या मल्लांनी ६ सुवर्ण तर कोल्हापूरच्या मल्लांनी २ सुवर्ण पदकांची कमाई केली.**



बारामती येथील विद्यानगरी प्रतिष्ठानच्या क्रीडा संकुलात सुरु असलेल्या महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील कुस्त्यांना मोठा प्रतिसाद मिळाला. विविध वजनगटात झालेल्या या कुस्त्यांमध्ये महावितरणच्या कसलेल्या कुस्तीगिरांनी डाव-प्रतिडाव व ताकदीची चपळता दाखवत प्रेक्षकांची मने जिंकली. यात राष्ट्रीय कुस्तिगीर अमोल गवळी यांच्या लढतीला विशेष प्रतिसाद मिळाला. कलाजंग, ढाक, मोळी, एकेरी पट, दुहेरी पट, धोबीपछाड अशा डावपेचांनी लडाईमध्ये चांगलाच थरार रंगला. पुणे बारामती संघातील कुस्तिगिरांनी वर्चस्व गाजवत १० पैकी तब्बल ६ तर कोल्हापूरने २ तसेच अकोला-अमरावती व मुख्यालय-भांडूप संघाने प्रत्येकी एक सुवर्ण पदक मिळवले. या कुस्त्यांच्या सामन्यांना पुणे प्रादेशिक संचालक श्री. भुजंग खंदारे, मुख्य अभियंता श्री. धर्मराज पेठकर, मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. भुषण कुलकर्णी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके आदींसह कुस्तीप्रेमींची मोठ्या संख्येत उपस्थिती होती. विविध डावपेच अन् ताकदीचा अनोखा संगम सादर केल्याने कुस्तीप्रेमी प्रेक्षकांना थरार अनुभवता आला. या रंगलेल्या कुस्त्यांमध्ये पुणे-बारामती संघाच्या मल्लांनी ६ सुवर्ण तर कोल्हापूरच्या मल्लांनी २ सुवर्ण पदकांची कमाई केली.

### 10 घंटा गाडी द्वारे दवंडी

६१ किलो- विनोद गायकवाड (अकोला-अमरावती) व शरद मोकाळे , ६५ किलो- राजकुमार काळेव सुर्यकांत गायकवाड , ७० किलो- अनंत नागरगोजे व युवराज निकम , ७४ किलो- गुरुप्रसाद देसाई (कोल्हापूर) व जयकुमार तेलगावकर (संभाजीनगर-लातूर-नांदेड), ७९ किलो- अकील मुजावर (पुणे-बारामती) व जोतिबा ओंकार (कोल्हापूर), ८६ किलो- महावीर जाधव (पुणे-बारामती) व बेलराज अलाने (संभाजीनगर-लातूर-नांदेड), ९२ किलो- अमोल गवळी (पुणे-बारामती) व तुषार वारके , ९७ किलो- महेश कोळी (पुणे-बारामती) व हणमंत कदम (कोल्हापूर), १२५ किलो- प्रमोद ढेरे (कोल्हापूर) व वैभव पवार (पुणे-बारामती).

# पवना धरणातील पाणीसाठा 64 टक्क्यांवर!

## शहरात मागील साडेपाच वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा

। पिंपरी- चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मागील ८ ते १० दिवसांपासून उन्हाचा चटका वाढला असून, मावळ तालुक्यातील पवना धरणातील पाणीसाठा कमी होऊ लागला आहे. धरणातील पाणीसाठा ६३.९२ टक्क्यांवर आला आहे.**



दुसरीकडे, पिंपरी-चिंचवड शहराला मागील साडेपाच वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या वाढत असल्यामुळे पाण्याची मागणीही सातत्याने वाढू लागली आहे. सद्यःस्थितीत शहराला मावळातील पवना धरणातून ५१०, आंद्रा धरणातून ८०, एमआयडीसीकडून २० असे ६१० दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणीपुरवठा केला जात आहे. तसेच भविष्याचा विचार करून महापालिकेच्या वतीने भामा आसखेड धरणातून १६७ एमएलडी पाणी आणण्याचे नियोजन आहे. त्यासाठी जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. या कामाला वेग आला असून डिसेंबर२०२५ अखेर या जलवाहिनीचे काम पूर्ण करण्याचा मानस महापालिका प्रशासनाचा आहे.

पवना धरणात ६३.९४ टक्के पाणीसाठा आहे. गतवर्षी आजअखेर धरणात ६२.९१ टक्के पाणीसाठा होता. त्यामुळे यंदा गतवर्षापेक्षा १.३ इतका अधिक पाणीसाठा धरणात शिल्लक असून तो १५ जुलैअखेर पुरेल. असे असले तरी शहरवासीयांनी पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन पवना धरणाचे शाखा अभियंता रजनीश बारिया यांनी केले आहे.

### 5 फेब्रुवारी अखेरपर्यंत धरणातील पाणीसाठा

| वर्ष | साठा (टक्के |
|---|---|
| २०२१ | ७१.२१, |
| २०२२ | ६३.६७, |
| २०२३ | ६३.१६, |
| २०२४ | ६२.९१, |
| २०२५ | ६३.९२. |




# भारतातील सर्वात मोठे देशी गोवंश अन् अश्व प्रदर्शन

## अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचा पुढाकार : सिनेकलावंतांसोबत रंगणार खिल्लार रॅम्पवॉक

। जुनी सांगवी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**अखिल भारतीय बैलगाडा संघटनेच्या पुढाकाराने मोशी येथील आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र येथे दि. 1 आणि 2 मार्च 2025रोजी देशी गोवंश तसेच अश्व प्रदर्शन आयोजित केले आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून कोसा, काजळी, देवनी, खिल्लार, लाल कंधारी, साहिवाल, लाल सिंधी, गीर, ओंगोले, वेचूर अशा विविध प्रकारातील गोवंशासाठी प्रजातिनिहाय स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.**




विशेष म्हणजे, प्रदर्शनाच्या निमित्ताने सिने कलावंतांसह खिलार रॅम्प ऑफ देखील आयोजित करण्यात आला आहे. तसेच, पशु प्रेमींसाठी प्रदर्शनस्थळी जनावरांची खरेदी-विक्री बाजार देखील भरविण्यात येणार आहे.

अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष संदीप बोदगे म्हणाले की, भारतीय जनता पार्टीचे नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून देशी गोवंश व अश्व प्रदर्शन आयोजित केले आहे. मोशी येथील हिंदूभूषण छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र येथे हे प्रदर्शन होणार आहे. गोवंश आणि अश्व प्रदर्शनाच्या माध्यमातून कोसा, काजळी, देवनी, खिल्लार, लाल कंधारी, साहिवाल, लाल सिंधी, गीर, ओंगोले, वेचूर अशा विविध प्रकारातील गोवंशासाठी प्रजातिनिहाय स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. नोंदणी करण्याची अंतिम तारीख ही दि. २३ फेब्रुवारी असून, सहभागी गोवंश प्रदर्शनस्थळी २८ फेब्रुवारी सायंकाळी सहा वाजेपर्यंत उपस्थिती राहणे अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी 8862909090 या क्रमांकावर संपर्क साधवा, असे आवाहन केले आहे.

### जातिवंत गोवंश स्पर्धा ठरणार आकर्षण :

गाय आणि बैल गटामध्ये कोसा, काजळी , गाजरी खिल्लार , कपिला अशा जातिवंत गोवंश स्पर्धा रंगतील. मारवाडी अश्व ,खिल्लार बैलजोडी, पंढरपुरी म्हैस, रेडा यांच्यातील स्पर्धा विशेष आकर्षण ठरणार आहेत. यासाठी आकर्षक बक्षिसे देखील आयोजकांनी मार्फत ठेवण्यात आली आहेत.

### प्रदर्शनासाठी नियम व अटी :

कमीत-कमी एका गटात १० गोवंश असणे आवश्यक आहे. काजळी आणि कोसा गटामध्ये संख्या जास्त आली,तर गट वेगळे केले जातील.पंच गोवंशाची निवड करण्याअगोदर तुम्हाला यापुर्वी मिळालेल्या बक्षिसांचा विचार करणार नाही. निवड पूर्णपणे पंचांच्या निवड प्रक्रियेने होईल. ७५ कि.मी पेक्षा जास्त अंतरावरून येणाऱ्या गोवंश पालकांना काही प्रमाणात वाहतूक भाडे मिळणार आहे. प्रदर्शनामध्ये गैरवर्तन करणाऱ्या पशुपालकास पुढील ३ वर्षांसाठी बंदी राहील, अशी माहिती अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष संदीप बोदगे यांनी दिली.

## रिकामा वेळ सगळा भगवंताकडे लावावा »



साधारणपणे ज्या वस्तू देहाला सुख देतात त्या पुष्कळ मिळवणे हे आपल्या जन्माचे ध्येय आहे असे आपल्याला वाटते. परंतु अशा वस्तू ज्यांच्यापाशी पुष्कळ आहेत ती माणसे सुखी झालेली आढळत नाहीत. किंबहुना, अशा वस्तू जितक्या जास्त जमा कराव्या तितकी आपली हाव वाढतच जाते. पुढे वय झाल्यावर देह क्षीण होतो आणि त्याचे भोगण्याचे सामर्थ्य कमी होते. मग वस्तू असून देखील मनाची तळमळ कायम राहते. म्हणून शहाण्या माणसाने आत्तापासूनच आपले सुख बाहेरच्या वस्तूवर अवलंबून न ठेवण्याचा अभ्यास करावा. बाहेरची वस्तू सुटली तरी मनाला दुसरी वस्तू देणे अवश्य असते. अशी वस्तू म्हणजे भगवंत होय. भगवंत हा नेहमी राहणारा, स्वयंपूर्ण आणि आनंदमय असल्यामुळे त्याचे चिंतन करता करता मनामध्ये ते गुण उतरतात. अर्थात, मन भगवंताच्या चिंतनाने आनंदमय बनल्यावर त्या माणसाचे जीवन किती रसमय होत असेल याची कल्पना करावी. आपल्यासारख्या व्यवहारी प्रापंचिक माणसांना चिंतन करण्यात एकच अडचण येते. ती म्हणजे व्यवहार आणि साधन यांची जोड घालणे. आपली अशी कल्पना असते की, भगवंताचे चिंतन करणारा माणूस व्यवहार बरोबर करू शकत नाही. तुकाराममबुवांसारख्या परमात्मचिंतनात बेभान झालेल्या पुरुषांची गोष्ट निराळी. आपल्यासारख्या माणसांना आपला व्यवहार अत्यंत बरोबर केल्यानंतर जो वेळ उरेल तितका भगवंताकडे लावला तर आपण फारच प्रगती केली असे म्हणता येईल. खरे पाहिले असता सध्या जेवढा रिकामा वेळ आपल्याला मिळतो तितका सगळा आपण भगवंताकडे लावत नाही. म्हणून दिवसातून काही वेळ तरी अत्यंत नियमाने भगवंताच्या नामस्मरणात घालवायचा आपण निश्चय करावा. नामाच्या आड सर्वच गोष्टी येतात, आपण स्वत:देखील त्याच्या आड येतो, तेवढे सांभाळावे आणि जगाच्या नादी फारसे न लागता आपले नाम चालू ठेवावे. शिवाय, देवासंबंधीची फक्त संतांनी लिहिलेली पुस्तके रोज थोडी वाचावी, त्यावर मनन करावे, आणि ते आपल्या आचरणात कसे येईल याचा सूक्ष्म विचार करावा. अशा मार्गाने जो जाईल त्याची हां हां म्हणता प्रगती होईल आणि त्याला समाधान मिळेल.

**बोधवचन:- समाधान हीच खऱ्या आनंदाची खूण आहे.**



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# ट्रम्प यांची राजनीती, बेधडक, विक्षिप्त कृती!

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे विक्षिप्त म्हणून जगप्रसिद्ध आहेत. अमेरिका हे लोकशाही राष्ट्र असले तरी ट्रम्प यांच्या विक्षिप्तपणाचा फटका अनेकदा त्यांच्या देशाला बसला आहे. काही काळासाठी लोकशाही बाजूला ठेवून उत्तम हे नेहमीच हुकूमशाहीची वाहवा करताना दिसतात. मग, त्यांच्यावर होणारे आरोप किंवा त्यातून उद्भवणारी संकटे, यांचा ते कधीच विचार करत नाहीत, हे पूर्ण जगाला माहित आहे.**



अशी अनेक उदाहरणे सादर केली आहेत. पण, प्रत्यक्षात आता भारतावरच ती वेळ आल्यामुळे तो एक चर्चेचा विषय बनला आहे. ट्रम्प यांच्यासाठी ती राजनीती आहे, पण भारतासाठी बेधडक, बेजबाबदारपणा विक्षिप्तपणाची कृती आहे, असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल!

### भारत आणि अमेरिकेचे मित्रसंबंध

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची मैत्री अवघ्या जगात प्रसिद्ध आहे. असे असतानाही ट्रम्प हे असे का वागले? हा एक शोधाचा विषय म्हणावा लागेल. भारतीयांची वेदनादायी घरवापसी अमेरिकेत अवैध वास्तव्य करणाऱ्या भारतीयांना हाता-पायात बेड्या घालून अमानवी आणि अपमानास्पद वागणूक देत पुन्हा भारतात पाठवण्याचा मुद्दा सध्या देशभर गाजत आहे. संसदेचे अधिवेशन सुरू असल्यामुळे विरोधकांनी सरकारला कोंडीत पकडले असून भारताने आता आक्रमक भूमिका घ्यावी, अशी मागणी केली जाऊ लागली आहे.

### एस. जयशंकर यांची सारवासारव

संसदेमध्ये विरोधकांनी या मुद्द्यावर ज्यावेळी मोदी सरकारला धारेवर धरले आणि तो प्रश्न राज्यसभेत विचारण्यात आला, त्यावर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्यावर सारवासारव करण्याची वेळ आली. बेड्या घालणे हा अमेरिकेच्या स्थलांतरण व आयात शुल्क संचनालयाच्या मानद संचालन प्रक्रियेचा एक भाग आहे, असे ते म्हणाले. पण, याबाबत स्थलांतरितांना अमानुष वागणूक मिळू नये, यासाठी अमेरिकेशी बोलणी सुरू असल्याचा दावाही त्यांनी केला. मूळ घटना अशी आहे, की अमेरिकेने १०४ भारतीयांना लष्करी विमानातून अमृतसरमध्ये आणून सोडले. ही नागरिक अवैधरीत्या अमेरिकेमध्ये राहत होते. त्यांचे बेकायदेशीर राहणे चुकीचेच आहे. त्यावरून विरोधक संतप्त झाले आहेत, आणि ते योग्यही आहे. दुसरीकडे, अमेरिकेच्या स्थलांतरितांना बेड्या घालण्याच्या धोरणाचे परराष्ट्रमंत्री समर्थन करतात, असा थेट आरोप करून विरोधकांनी चांगलाच दंगा घातला. या ठिकाणी मुद्दाम एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, की ती अमेरिका होती म्हणून हे जिवंत राहिले, पाकिस्तान किंवा दुसरा कोणता देश असता तर..?

### विमान का पाठवले नाही?

आपल्या स्थलांतरित नागरिकांची पाठवणी होणार हे सरकारला माहित होते, मग आपल्या नागरिकांसाठी भारताने विमान का पाठवले नाही, हा पहिला प्रश्न आणि कोलंबिया जर विमान पाठवू शकतो, तर भारत का नाही हा दुसरा प्रश्न..! याबाबत सरकारची आळीमिळी गुपचिळी आहे.

### स्थलांतरितांचा प्रश्न ट्रम्प यांना प्यारा !

डोळ्यासमोर फक्त अमेरिकेचे हित लक्षात ठेवून राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आपली व्यूहरचना करीत असतात आणि तेच त्यांचे नेहमी धोरण असते, हे जगातील सर्व राष्ट्रांना माहीत आहे. स्थलांतरितांना तीव्र विरोध करणे, ही त्यांची विचारसरणी किंवा मानसिकताच आहे. म्हणूनच मेक्सिकोच्या सीमा भागात भिंत बांधण्याच्या घोषणा करण्यापासून ते अमेरिकेतील सर्व बेकायदेशीर स्थलांतरितांना हाकलून देण्यापर्यंतची गर्जना त्यांनी वेळोवेळी केली आहे.

### अमेरिकेत कोट्यवधी स्थलांतरित

या ठिकाणी अजून एक मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे, तो म्हणजे अमेरिका हा मूलतः स्थलांतरितांमधूनच आकारला गेलेला देश असून सुमारे सव्वा कोटी स्थलांतरित नागरिक तेथे राहतात. या सर्वांना हद्दपार केल्यास लोकांना ज्या विविध सेवा स्वस्तात मिळतात, त्या मिळणार नाहीत. त्यामुळे सर्व बेकायदेशीर स्थलांतरितांना विमान, जहाज अथवा बसमधून देशाबाहेर काढण्याऐवजी निवडक कारवाई करणे, ही ट्रम्प यांची व्यूहरचना असेल, त्यामुळे त्यांचे समर्थकही खुश होऊ शकतील आणि बाकी जनतेला महागाईस तोंड द्यावे लागणार नाही. हा त्यामागील साधा ठोकताळा आहे. स्थलांतरित नागरिक हे कमी पैशात विविध कामे करतात आणि अत्यंत कमी दरात आपली सेवा पुरवतात. हा संपूर्ण जगाचा अनुभव आहे. जागतिकीकरणामुळे मजुरांचे स्थलांतर वाढले, पण ट्रम्प यांचा मुळात जागतिकीकरणासच विरोध आहे.

### नरेंद्र मोदी यांचा अमेरिका दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा याच महिन्यात अमेरिका दौरा असून त्यापूर्वीच हे पाऊल उचलण्याची घोषणा ट्रम्प यांनी केल्यानंतर भारतात धाडण्यात येणारी ही पहिलीच टोळी होती. खरे तर, ज्यो बायडन हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असतानाही गेल्या वर्षी आपल्या भारताच्या अकराशे बेकायदेशीर स्थलांतरि तांना विशेष विमानांनी भारतात आणून सोडले गेले होते. पण, त्यावेळच्या प्रशासनाने याची जाहीर वाच्यता अथवा चर्चा केली नाही, किंवा त्याचे राजकारणही केले नाही. आता, अमेरिकेच्या स्थलांतर विभागाचे अधिकारी वीस हजार बेकायदेशीर रहिवाशांना म्हणजेच स्थलांतरित भारतीयांना परत धाडण्यास सज्ज आहेत. अमेरिकेत एकूण सव्वासात लाख भारतीय कोणत्याही कागदपत्रांशिवाय रहिवास करत आहेत, त्यांचा देखील मोठा प्रश्न आहेच!नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या चर्चेत त्यांनी आपल्याला योग्य वाटत असेल ते करण्यास सांगितले आहे, ते बेकायदेशीर स्थलांतरितांना परत घेण्यास तयार आहेत, असे ट्रम्प यांनी स्पष्टपणे म्हटले होते. जानेवारीत परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी अमेरिकेचे प्ररराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांची यासंदर्भात भेट घेऊन चर्चा केली होती. त्यावेळी बेकायदा स्थलांतरांचीही पडताळणी करून त्यांना परत घेण्यास तयार असल्याचे जयशंकर यांनी स्पष्टपणे सांगितले होते, याचे भारतीयांना भान नाही.

### भारतात बेकायदा राहणाऱ्यांचे काय?

आता जागतिक पातळीवर हा स्थलांतराचा प्रश्न आलाच आहे, तर भारतात बेकायदेशीरपणे राहणारे रोहिंग्या आणि बांगलादेशी यांच्या विरोधात मोहीम सुरू केली जाते का, हे पाहणे महत्त्वाचे आहे. आपल्यालाही दुसऱ्या देशात कोणत्याही अनधिकृतपणे राहणाऱ्या भारतीयांचे समर्थन करता येणार नाही. आज महाराष्ट्रात मुंबईपासून मालेगावपर्यंत असंख्य बांगलादेशी आणि रोहिंग्या राहत आहेत. त्यांना आधार कार्ड, पॅन कार्ड,रेशन कार्ड देणारे आपलेच भ्रष्ट अधिकारी असतात, हे लक्षात घ्यावेच लागेल. असे भ्रष्ट अधिकारी ही खऱ्या अर्थाने आपल्या देशाला लागलेली कीड आहे आणि ती चिरडायलाच हवी. डोनाल्ड ट्रम्प जर निष्ठूरपणे वागत असतील, तर मोदी सरकारला वागण्यास काय हरकत आहे? स्थलांतरित नागरिकांचा प्रश्नदेखील भारताने लवकरात लवकर सोडवावा, अशी सर्वसामान्यांची इच्छा आहे आणि आपल्या देशात बेकायदा राहणाऱ्यांना त्यांच्या घरी पाठवून द्यावे, हीच मागणी जोर धरू लागली तर त्यात गैर ते काय ?

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राहुल गांधी यांना नौटंकी करायची!

## एक चुटकुलेपर बार-बार हंसा नहीं करते : फडणवीस

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीचा मोठा विजय झाल्याचं पाहायला मिळालं. लोकसभा निवडणुकीत दिसणारा कल विधानसभा निवडणुकीत पूर्णपणे बदलल्याची प्रतिक्रिया या निकालांवर व्यक्त करण्यात आली. यासंदर्भात अनेक दावे-प्रतिदावेही केले गेले. या निवडणुकांमध्ये गैरप्रकार झाल्याचा गंभीर आरोप राज्यातील विरोधी पक्षांकडून अर्थात महाविकास आघाडीकडून करण्यात येत होते. आज लोकसभा विरोधी पक्षनेते व काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाच्या खासदार सुप्रिया सुळे व शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांच्यासह घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत महाराष्ट्र विधानसभा निवडणुकींबाबत सविस्तर आकडेवारी देऊन तीन महत्त्वाचे प्रश्न निवडणूक आयोगाला केले आहेत.**





महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत झाली होती, ज्यामध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीला मोठा विजय मिळला. दरम्यान हा निवडणूक निकाल आणि निवडणूक प्रक्रिया याबद्दल विरोधकांकडून वेगवेगळे आरोप केले जात आहेत. आज लोकसभा विरोधी पक्षनेते व काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाच्या खासदार सुप्रिया सुळे व शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांच्यासह घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत महाराष्ट्र विधानसभा निवडणुकींबाबत पुन्हा प्रश्न उपस्थित केले आहेत. यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर यासंबंधी पोस्ट करत प्रतिक्रिया दिली आहे.देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवर एक वाक्यात प्रतिक्रिया दिली आहे. "जेव्हा एकच विनोद पुन्हा पुन्हा ऐकवला जातो तेव्हा त्यावर हसू येत नाही (जब एक ही चुटकुला बार-बार सुनाया जाए तो उसपर हंसा नहीं करते!)," असे देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. विशेष म्हणजे फडणवीस यांनी ही पोस्ट काँग्रेसचे नेत राहुल गांधी यांना टॅग करत केली आहे.देवेंद्र फडणवीस यांच्याप्रमाणेच भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी देखील राहुल गांधी यांना प्रत्युत्तर दिले आहे. बावनकुळे म्हणाले की, "काँग्रेस नेते राहुल गांधी आणि विरोधक महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत झालेला दारुण पराभव स्विकारण्याच्या मानसिकतेत अजूनही आलेले नाहीत. किंबहुना पराभवाच्या त्या धक्क्यातून ते अद्याप सावरलेले नाहीत. म्हणून आता ते मतदारसंख्येवर संशय घेत आहेत. खरं तर निवडणूक आयोगानं यापूर्वीच मतदार वाढीबाबत वारंवार स्पष्ट उत्तरं दिली आहेत, तरीही दिशाभूल करणारे आरोप करून लोकशाहीची बदनामी करण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून सातत्याने केला जात आहे"."उद्या दिल्ली विधानसभा निवडणुकीचा निकाल लागणार आहे. यात होणारा पराभव आधीच दिसत असल्यामुळे राहुल गांधी यांची रडारड आतापासूनच सुरू झाली आहे. जनतेनं काँग्रेस आणि त्यांच्या सहयोगी पक्षांना सातत्यानं नाकारलं आहे, हे वास्तव स्वीकारण्याची त्यांची तयारी नाही. आता पराभव लपवण्यासाठी निवडणूक प्रक्रियेवर शंका घेणं, हा निराशेचा कळस आहे," असेही

### लोकशाहीची विटंबना करू नका

"खरं तर या पत्रकार परिषदेत शेजारी बसलेल्या सुप्रियाताई सुळे यांनी 'मी याच ईव्हीएमवर विजयी झाले' असं सांगितलं होतं. पण राहुल गांधी यांना नौटंकी करायची असल्यानं ते सत्य स्वीकारणार नाहीत. राहुलजी लोकशाहीवर विश्वास ठेवा, निराधार आरोप करून लोकशाहीची विटंबना करू नका. या देशातील जनतेला आपला खोटारडेपणा आता पुरता कळून चुकला आहे," असे अवाहनही त्यांनी राहुल गांधींना केले आहे."काँग्रेस नेते राहुल गांधी आणि विरोधक महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत झालेला दारुण पराभव स्विकारण्याच्या मानसिकतेत अजूनही आलेले नाहीत. किंबहुना पराभवाच्या त्या धक्क्यातून ते अद्याप सावरलेले नाहीत.

# एकूण लोकसंख्येपेक्षा जास्त मतदार कसे?

## राहुल गांधींनी मांडलं गणित; उपस्थित केले तीन मुद्दे!

।कोल्हापूर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीचा मोठा विजय झाल्याचं पाहायला मिळालं. लोकसभा निवडणुकीत दिसणारा कल विधानसभा निवडणुकीत पूर्णपणे बदलल्याची प्रतिक्रिया या निकालांवर व्यक्त करण्यात आली. यासंदर्भात अनेक दावे-प्रतिदावेही केले गेले. या निवडणुकांमध्ये गैरप्रकार झाल्याचा गंभीर आरोप राज्यातील विरोधी पक्षांकडून अर्थात महाविकास आघाडीकडून करण्यात येत होते.**



आज लोकसभा विरोधी पक्षनेते व काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाच्या खासदार सुप्रिया सुळे व शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांच्यासह घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांबाबत सविस्तर आकडेवारी देऊन तीन महत्त्वाचे प्रश्न निवडणूक आयोगाला केले आहे"नित्यात सरन्यायाधीश, विरोधी पक्षनेते आणि पंतप्रधान होते. त्यात सरकारकडून बदल करण्यात आला. सरन्यायाधीशांना त्यातून बाहेर काढण्यात आलं आणि एका भाजपा व्यक्तिला त्या समितीत दाखल करण्यात आलं. लोकसभा निवडणुकीच्या आधी निवडणूक आयुक्तांना हटवण्यात आलं असं राहुल गांधी म्हणाले. विधानसभा निवडणूक २०१९ ते लोकसभा निवडणूक २०२४ या पाच वर्षांत ३२ लाख मतदारांचा याद्यांमध्ये नव्याने समावेश करण्यात आला. पण लोकसभा २०२४ ते विधानसभा २०२४ या पाच महिन्यांत ३९ लाख नवे मतदार समाविष्ट झाले. लोकसभा निवडणुकीनंतर पाच महिन्यांत समाविष्ट झालेले मतदार आधीच्या पाच वर्षांतल्या मतदारांपेक्षा जास्त कसे? हे ३९ लाख मतदार कोण आहेत?

### निवडणूक आयोगाकडे मागणी

आख्ख्या हिमाचल प्रदेशमध्ये ३९ लाख मतदार आहेत. आणि तेवढे नवे मतदार महाराष्ट्रात मतदार याद्यांमध्या समाविष्ट झाले आहेत", एकूण लोकसंख्येपेक्षाही महाराष्ट्रातील एकूण नोंदणीकृत मतदार जास्त कसे होतात? सरकारच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ९.५४ कोटी आहे. पण निवडणूक आयोगानुसार महाराष्ट्रात त्याहून जास्त म्हणजे ९.७ कोटी मतदार आहेत. लोकसंख्येपेक्षा मतदारांची संख्या जास्त आहे. त्यामुळे महाराष्ट्रात अचानक हे मतदार तयार करण्यात आले आहेत", असा दावा राहुल गांधींनी केला.महाराष्ट्रात विरोधी पक्षांना जितक्या मतदारांनी मतदान केलं त्यांची संख्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीदरम्यान अजिबात कमी झालेली नाही.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचा अमेरिका दौरा ठरला

## अमेरिकेला जाण्यापूर्वी 10 ते 12 फेब्रुवारी दरम्यान फ्रान्सचा दौरा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी १२ ते १३ फेब्रुवारी दरम्यान अमेरिकेला भेट देणार आहेत, अशी घोषणा परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी शुक्रवारी केली. अमेरिकेत नुकत्याच झालेल्या अध्यक्षीय निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांनी दमदार विजय मिळवत राष्ट्राध्यक्षपदी पुनरागमन केले आहे. दरम्यान ट्रम्प यांनी अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून २० जानेवारी रोजी शपथ घेतली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रथमच अमेरिका दौऱ्यावर जात आहेत.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेला जाण्यापूर्वी १० ते १२ फेब्रुवारी दरम्यान फ्रान्सचा दौरा करणार आहेत. तिथे ते पॅरिसमध्ये होणाऱ्या आर्टिफिशियल इंटेलिजेंस ॲक्शन समिटचे सह-अध्यक्षपद भूषवणार आहेत. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी १२ फ्रेब्रुवारीला फ्रान्सहून अमेरिकेला जाणार असल्यामुळे १३ फेब्रुवारीला त्यांची राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट होण्याची शक्यता आहे.आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते विक्रम मिस्त्री म्हणाले की, “डोनाल्ड ट्रम्प यांच्या निमंत्रणावरून होत असलेला पंतप्रधान नरेंद्र मोदींचा हा अमेरिका दौरा दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंधांना अधिक चालना आणि दिशा देईल. ट्रम्प यांच्या शपथविधीनंतर अमेरिकेला भेट देणाऱ्या पहिल्या काही जागतिक नेत्यांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा समावेश असेल.”परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते विक्रम मिस्त्री यांनी पुढे सांगितले की, “पंतप्रधान मोदी त्यांच्या दोन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यात अनेक उद्योगपतींशी भेट घेणार असून, वरिष्ठ अमेरिकन अधिकारी देखील पंतप्रधानांना भेटण्याची अपेक्षा आहे. त्याचबरोबर या अमेरिका दौऱ्यात पंतप्रधान मोदी भारतीय नागरिकांशीही संवाद साधणार आहेत.” दरम्यान पंतप्रधान मोदी त्यांच्या भेटीदरम्यान टेस्लाचे सीईओ एलोन मस्क यांचीही भेट घेण्याची अपेक्षा आहे.डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेची सूत्रे हाती घेतल्यानंतर अनेक निर्णय घेतले आहेत. त्यामध्ये अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या भारतीयांना मायदेशी परत पाठवण्याच्या निर्णयाचाही समावेश आहे. बुधवारी, अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या १०४ भारतीय नागरिकांना घेऊन अमेरिकेचे लष्करी विमान अमृतसरमधील श्री गुरु रामदास जी आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचले होते. या स्थलांतरितांपैकी ३० जण पंजाबचे, हरियाणा आणि गुजरातचे प्रत्येकी ३३ जण, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशचे प्रत्येकी तीन जण आहेत, तर दोन जण चंदीगडचे आहेत. यामध्ये १९ महिला आणि १३ अल्पवयीन मुलांचाही समावेश आहे. या मुद्द्यावरही पंतप्रधान मोदी आणि ट्रम्प यांच्यात चर्चा होण्याची शक्यता आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेला जाण्यापूर्वी १० ते १२ फेब्रुवारी दरम्यान फ्रान्सचा दौरा करणार आहेत. तिथे ते पॅरिसमध्ये होणाऱ्या आर्टिफिशियल इंटेलिजेंस ॲक्शन समिटचे सह-अध्यक्षपद भूषवणार आहेत. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी १२ फेब्रुवारीला फ्रान्सहून अमेरिकेला जाणार असल्यामुळे १३ फेब्रुवारीला त्यांची राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट होण्याची शक्यता आहे.आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते विक्रम मिस्त्री म्हणाले की, “डोनाल्ड ट्रम्प यांच्या निमंत्रणावरून होत असलेला पंतप्रधान नरेंद्र मोदींचा हा अमेरिका दौरा दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंधांना अधिक चालना आणि दिशा देईल. ट्रम्प यांच्या शपथविधीनंतर अमेरिकेला भेट देणाऱ्या पहिल्या काही जागतिक नेत्यांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा समावेश असेल.”परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते विक्रम मिस्त्री यांनी पुढे सांगितले की, “पंतप्रधान मोदी त्यांच्या दोन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यात अनेक उद्योगपतींशी भेट घेणार असून, वरिष्ठ अमेरिकन अधिकारी देखील पंतप्रधानांना भेटण्याची अपेक्षा आहे.

### फ्रान्सहून अमेरिकेला जाणार

पंतप्रधान मोदी त्यांच्या भेटीदरम्यान टेस्लाचे सीईओ एलोन मस्क यांचीही भेट घेण्याची अपेक्षा आहे.डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेची सूत्रे हाती घेतल्यानंतर अनेक निर्णय घेतले आहेत. त्यामध्ये अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या भारतीयांना मायदेशी परत पाठवण्याच्या निर्णयाचाही समावेश आहे. बुधवारी, अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या १०४ भारतीय नागरिकांना घेऊन अमेरिकेचे लष्करी विमान अमृतसरमधील श्री गुरु रामदास जी आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचले होते. या स्थलांतरितांपैकी ३० जण पंजाबचे, हरियाणा आणि गुजरातचे प्रत्येकी ३३ जण, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशचे प्रत्येकी तीन जण आहेत, तर दोन जण चंदीगडचे आहेत. यामध्ये १९ महिला आणि १३ अल्पवयीन मुलांचाही समावेश आहे. या मुद्द्यावरही पंतप्रधान मोदी आणि ट्रम्प यांच्यात चर्चा होण्याची शक्यता आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी १२ ते १३ फेब्रुवारी दरम्यान अमेरिकेला भेट देणार आहेत, अशी घोषणा परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी शुक्रवारी केली. अमेरिकेत नुकत्याच झालेल्या अध्यक्षीय निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांनी दमदार विजय मिळवत राष्ट्राध्यक्षपदी पुनरागमन केले आहे.

# लाडक्या बहिणींसाठी ठाकरेंनी उठवला आवाज

## ईडी, इनकम टॅक्स आणि सीबीआय बाजूला ठेवा : उद्धव ठाकरे

। प्रयागराज ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सहा महिन्यांपूर्वी राज्य सरकारने राज्यातील महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेद्वारे राज्यातील लाखो महिलांना मासिक आर्थिक लाभ देण्यात येत आहे. अशात आता सरकारने या योजनेचे निकष बदण्याचा निर्णय घेतला असल्यामुळे या योजनेसाठी पाच लाख महिला अपात्र ठरणार आहेत.**

यानंतर सरकारच्या या निर्णयावर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी टीका केली आहे. आज ‘शिवबंधन’ कार्यअहवाल प्रकाशन सोहळ्यात त्यांनी, “जर अपात्र ठरणाऱ्या पाच लाख महिलांना दिलेले पैसे परत घेणार असाल तर त्यांनी दिलेली मतेही तुम्हाला मिळालेल्या मतांतून वगळणार आहात का?”, असा प्रश्न सत्ताधाऱ्यांना विचारला आहे.



या कार्यक्रमात बोलताना माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले, “आताच येताना मी एक बातमी वाचली. त्यामध्ये पाच लाख महिलांना लाडकी बहीण योजनेतून अपात्र करण्यात येणार असल्याचे समजले. जर लाडक्या बहिणींनी त्यांना विजय मिळवून दिला असेल तर, ही फसवणूक नव्हे तर काय आहे? बहिणींनी त्यांना जाऊन विचारले पाहिजे. तीन तीन भाऊ होते ना, जाकेट भाऊ, दाडी भाऊ, देवा भाऊ.”ते पुढे म्हणाले की, “आतापर्यंत या योजनेतून पाच लाख महिलांना अपात्र ठरवण्यात आले आहे. जर आता त्यांना दिलेले पैसे परत घेणार असाल आणि इथून पुढे लाभ देणार नसाल तर त्यांनी दिलेली मतेही तुम्हाला दिलेल्या मतदानातून वगळणार आहात का? कारण ही तुम्ही फसवून घेतलेली मते आहेत.

दरम्यान शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) ९ पैकी सहा खासदार फुटणार असल्याचे दावे करण्यात येत आहेत. यावरही उद्धव ठाकरे यांनी भाष्य केले. “ते म्हणत आहेत की सहा-सात खासदार फुटणार. पण, हिंम्मत असेल तर फोडून दाखवा. आता शिवसैनिकाच्या संयमाचा अंत पाहू नका. कारण फोडाफोडी करायला लागलात तर कधी तुमचे डोके फुटेल कळणार नाही.

### पाच लाख महिला अपात्र

राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेच्या बदललेल्या निकषांची माहिती एक्सवर दिली आहे. निकषांप्रमाणे संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी असलेल्या २,३०,००० महिला, वय वर्षे ६५ पेक्षा जास्त असलेल्या १,१०,००० महिला, कुटुंबातील सदस्यांच्या नावे चारचाकी गाडी असलेल्या महिला, नमोशक्ती योजनेच्या लाभार्थी असलेल्या आणि स्वेच्छेने योजनेतून नाव मागे घेणाऱ्या १,६०,००० महिलांना लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात आले आहे.

# अटक वॉरंटबद्दल सोनू सूदची पहिली प्रतिक्रिया



अभिनेता सोनू सूद सध्या सोशल मीडियावर मोठ्याप्रमाणात चर्चेत आला आहे. याचं कारण म्हणजे त्याला मिळालेलं अटक वॉरंट. पंजाबचे लुधियाना ज्यूडिशियल मॅजिस्ट्रेट रमणप्रीत कौर यांनी हे अटक वॉरंट दिलं आहे. सोनू सूदला अटक वॉरंट जारी होताच मनोरंजन विश्वात एकच खळबळ उडाली. अशात आता सोनू सूदने स्वत: या प्रकरणी आपली प्रतिक्रिया दिली आहे. Nसोनू सूदने त्याच्या एक्स (ट्रीटर) अकाउंटवर एक पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये त्याने लिहिलं आहे, "आम्हाला हे स्पष्ट करणे महत्वाचे वाटते की, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर येत असलेल्या बातम्या अत्यंत खळबळजनक आहेत. साध्या भाषेत सांगायचं झालं तर, आमचा या प्रकरणाशी प्रत्यक्षात कोणताही संबंध नाही. माननीय न्यायालयाने आम्हाला तृतीय पक्षाशी संबंधित प्रकरणामध्ये साक्षीदार म्हणून बोलावले होते.

# ६६ वर्षीय प्रसिद्ध गायक चौथ्यांदा लग्न करणार?

मनोरंजनसृष्टीतील कलाकार हे त्यांच्या कलाकृतींबरोबरच त्यांच्या खासगी आयुष्यामुळेदेखील मोठ्या चर्चेत असतात. ओ सनम, क्यूँ चलती है पवन अशा गाण्यांसाठी ओळखला जाणारा गायक लकी अली(LUCKY ALI) आता त्याच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आला आहे. याबरोबरच, त्याच्या कॉन्सर्टसाठीदेखील तो ओळखला जातो. याबरोबरच, गायकाच्या खासगी आयुष्यामुळेदेखील अनेकदा तो चर्चेत असतो. याआधी त्याची तीन लग्न झाली आहेत. आता एका कार्यक्रमात त्याला चौथे लग्न करण्याची इच्छा असल्याचे त्याने म्हटले आहे. दिल्लीमधील सुंदर नर्सरी येथे पार पडलेल्या १८ व्या कथाकार इंटरनॅशनल स्टोरीटेलर फेस्टिव्हल मध्ये लकी अली सहभागी झाला होता.या ठिकाणी त्यांनी सादरीकरणाबरोबरच त्याच्या काही गाण्यांचे किस्सेदेखील सांगितले आहे. या सगळ्यात या कार्यक्रमात लकी अलीने केलेले वक्तव्य सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. त्याला विचारण्यात आले की त्याचे पुढचे स्वप्न काय आहे? त्यावर लगेच उत्तर देत ६६ वर्षीय लकी अलीने म्हटले, "माझं स्वप्न आहे की मला पुन्हा लग्न करायचे आहे." लकी अलीच्या या वक्तव्यानंतर तो लग्नगाठ बांधणार का, यावर चर्चा सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. गायकाच्या वक्तव्याचे अनेक तर्क वितर्क लावले जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, लकी अलीने याआधी तीन वेळा लग्न केले आहे.

# ट्विंकल खन्नाच्या घराची विक्री

अभिनेता अक्षय कुमार(AKSHAY KUMAR) हा काही दिवसांपासून त्याच्या स्काय फोर्स या चित्रपटामुळे चर्चेत होता. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाल्याचे पाहायला मिळाले. आता मात्र अभिनेता त्याच्या चित्रपटामुळे नाही, तर त्याने घर विकल्यामुळे चर्चेत आला आहे. अक्षय कुमार व ट्विंकल खन्ना यांनी त्यांचे मुंबईतील त्यांचे लक्झरी अपार्टमेंट विकले आहे. मुंबईतील ओबेरॉय ३६० पश्चिम प्रकल्पातील हे अपार्टमेंट सी फेसिंग आहे. आता या सेलेब्रिटी जोडप्याने हे अपार्टमेंट किती रुपयांना विकले, हे जाणून घेऊ...मिळालेल्या माहितीनुसार, अक्षय कुमार व ट्विंकल खन्ना यांनी हे अपार्टमेंट ८० कोटी रुपयांना विकले आहे. इंडेक्सटॅप (INDEXTAP)च्या नियंत्रणात असलेल्या मालमत्तेच्या कागदपत्रांनुसार,अक्षय कुमार व ट्विंकल खन्ना यांचे अपार्टमेंट ओबेरॉय ३६० पश्चिम प्रकल्पात ३९ व्या मजल्यावर आहे. ६,८३० चौरस फूट इतकी या अपार्टमेंटची जागा आहे. अक्षय-ट्विंकलच्या अपार्टमेंटची प्रतिचौरस फूट किंमत १.१७ लाख आहे. या अपार्टमेंटला चार कार पार्किंगचीसुद्धा जागा आहे. ३१ जानेवारीला नोंदणी केलेल्या कागदपत्रांनुसार ४.८० कोटी रुपये मुद्रांक शुल्क म्हणून भरण्यात आले आहेत.अक्षय कुमार-ट्विंकल खन्ना यांच्याशिवाय ओबेरॉय ३६० पश्चिम प्रकल्पात अन्य काही बॉलीवूड कलाकारांचेही सोई-सुविधांनी युक्त असे अपार्टमेंट आहे. त्यामध्ये शाहिद कपूर, अभिषेक बच्चन यांचा समावेश आहे. शाहिद कपूर व मीरा कपूर यांनी मे २०२४ मध्ये ५,३९५ चौरस फूट क्षेत्रफळ असलेले अपार्टमेंट खरेदी केले होते. त्याची किंमत ६० कोटी इतकी होती.दरम्यान, अक्षय कुमारने याआधी मुंबईतील बोरिवली-पूर्व येथील एक अपार्टमेंट ४.२५ कोटींना विकले होते. हे अपार्टमेंट त्याने नोव्हेंबर २०१७ मध्ये २.३८ कोटी रुपयांना खरेदी केले होते.

# आईने दिला खास सल्ला



मुली साधारण १३- १४ वर्षांच्या झाल्या की त्यांचं आरशामध्ये स्वत:ला पाहण्याचं प्रमाण एकदमच वाढून जातं. येता जाता त्या आरशात डोकावून पाहतात. आजवर कधीही आपण कसे दिसतो आहोत, याची काळजी न करणाऱ्या मुली वाढत्या वयाच्या झाल्या की स्वत:च्या दिसण्याबाबत जास्तच जागरुक होतात. त्यांची हेअरस्टाईल, कपड्यांचा चॉईस यातही बदल होत जातो. आणि बहुतांश मुलींच्या डोक्यात त्याच काळात आपण किती वाईट दिसतो, आपण अजिबातच सुंदर नाही, आपण खूपच कशातरीच दिसतो असे किडे वळवळायला लागतात. यातून कित्येक मुलींचा कॉन्फिडन्स तर जातोच पण त्यांचं अभ्यासातही लक्ष लागत नाही. अशीच अवस्था झाली होती अभिनेत्री शिल्पा शेट्टीची ती म्हणे स्वत:ला कुरूप (UGLY) म्हणून रोज खूप रडायची..

# सिद्धार्थ चोप्राने प्रसिद्ध अभिनेत्रीशी केलं



'देसी गर्ल' प्रियांका चोप्राचा भाऊ सिद्धार्थ चोप्रा लग्नबंधनात अडकला आहे. सिद्धार्थने अभिनेत्री नीलम उपाध्यायशी लग्नगाठ बांधली. सिधार्थ व नीलम यांच्या लग्नातील पहिला व्हिडीओ समोर आला आहे. व्हिडीओमध्ये या दोघांच्या लग्नातील झलक पाहायला मिळत आहे. सिद्धार्थ चोप्राने लग्नात आयव्हरी रंगाची शेरवानी घातली होती, तर नीलमने लाल रंगाचा लेहेंगा परिधान केला होता. प्रियांकाने आकाशी रंगाचा सुंदर डिझायनर इंडो वेस्टर्न लेहेंगा परिधान केला होता. लग्नाच्या स्टेजवर प्रियांका चोप्रा भाऊ सिद्धार्थला घेऊन आली. तर, नीलमने गाण्यावर तिथे एंट्री केली, नंतर प्रियांकाने नीलमचं स्वागत केलं आणि तिला मंचावर घेऊन गेली. यावेळी निक जोनास व कुटुंबातील इतर सदस्य जबाबदाऱ्या पार पाडताना दिसले.सिद्धार्थ व नीलम यांच्या लग्नाआधीचे कार्यक्रम २-३ दिवसांपासून सुरू होते. हळदी व मेहंदी समारंभ दणक्यात पार पडला. त्यानंतर त्यांचा संगीत सोहळा गुरुवारी रात्री पार पडला. त्यांच्या संगीत सोहळ्याला अनेक सेलिब्रिटींनी हजेरी लावली होती. आज सिद्धार्थ व नीलमचे मुंबईत लग्न झाले. त्यांच्या लग्नाला मनारा चोप्रा व तिचे कुटुंबीय तसेच परिणीती चोप्रा व तिचे पती राजकारणी राघव चड्डा यांनी हजेरी लावली होती. रेखा व नीता अंबानीदेखील सिद्धार्थच्या लग्नाला उपस्थित राहिले.सिद्धार्थ चोप्राबद्दल बोलायचं झाल्यास तो प्रियांकाचा धाकटा भाऊ आहे. तो बहीण प्रियांकाचे प्रॉडक्शन हाऊस पर्पल पेबल पिक्चर्स सांभाळतो. तसेच त्यांनी हॉटेल व्यवसायही केला आहे. सिद्धार्थ त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत राहिला. कारण दोनदा त्याचं लग्न साखरपुड्यानंतर मोडलं. त्याने गर्लफ्रेंड कनिका माथुरशी साखरपुडा केला होता, पण तो मोडला. त्यानंतर २०१९ मध्ये त्याने इशिता कुमारशी साखरपुडा केला होता, पण लग्नाच्या काही दिवसांआधीच ते वेगळे झाले. तो साखरपुडा मोडल्यानंतर काही काळाने त्याच्या आयुष्यात अभिनेत्री नीलम उपाध्याय आली. दोघेही एकमेकांना डेट करू लागले. त्यानंतर त्यांनी २०२४ मध्ये साखरपुडा केला. त्यांच्या साखरपुड्याला प्रियांका चोप्रा व निक जोनास आले होते.

# या सर्व गोष्टींकडे लक्ष देत नाही!

## कन्कशन वादावर बोलताना राणाने टीकाकारांना दिले चोख प्रत्युत्तर

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यात खेळल्या जात असलेल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यात, वेगवान गोलंदाज हर्षित राणालाही टीम इंडियाच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळाले, ज्यामध्ये त्याने आपल्या पदार्पणाच्या एकदिवसीय सामन्यात चमकदार कामगिरी केली आणि एकूण तीन विकेट घेतल्या. हर्षित राणासाठी गेले काही महिने चांगले गेले आहेत, ज्यात त्याला टीम इंडियासाठी तिन्ही फॉरमॅटमध्ये पदार्पण करण्याची संधी मिळाली आहे.**



हर्षित राणाचे कन्कशन सबस्टीट्यूट चाहत्यांमध्ये आणि क्रिकेट तज्ञांमध्ये चर्चेचा विषय बनले आहे. इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेपूर्वी खेळल्या गेलेल्या टी-२० मालिकेतील चौथ्या सामन्यात हर्षितचा संघात अचानक बदल म्हणून संघात समावेश करण्यात आला, ज्यामध्ये तो शिवम दुबेच्या जागी आला. अनेक माजी खेळाडूंनीही या बदलावर टीका केली होती, त्यावर आता हर्षित राणाचे वक्तव्य समोर आले आहे.हर्षित राणाने इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, “लोक नेहमीच बोलत राहतील. मी अशा समस्यांकडे अजिबात लक्ष देत नाही. माझे काम मैदानावर चांगले खेळणे आहे. जेणेकरून मी संघाच्या विजयात योगदान देऊ शकेन. मला फक्त माझ्या देशासाठी चांगली कामगिरी करायची आहे आणि बाहेर काय चालले आहे याकडे मी लक्ष देत नाही.”हर्षित राणाने त्याच्या एकदिवसीय पदार्पणाच्या सामन्यात मिळालेल्या अनुभवाबद्दल सांगितले की, “हा फॉरमॅट थोडा कठीण आहे. कारण १० षटके गोलंदाजी करताना तुम्हाला वेगवेगळ्या प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागते. परंतु, आपण सातत्यपूर्ण चांगल्या सरावाने ते अधिक चांगल्या प्रकारे हाताळू शकतो.”भारतीय संघाकडून खेळणारा हर्षित राणा आता तिन्ही फॉरमॅटमध्ये पदार्पणाच्या सामन्यात तीन विकेट घेणारा टीम इंडियाचा पहिला गोलंदाज ठरला आहे. हर्षितने आत्तापर्यंत खेळलेल्या २ कसोटी सामन्यात ४ विकेट्स घेतल्या आहेत, तर एकदिवसीय आणि टी-२० सामन्यात प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या आहेत. इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेनंतर, टीम इंडियाला चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्येही खेळायचे आहे ज्यामध्ये जसप्रीत बुमराहचा बॅकअप म्हणून हर्षितचा राखीव खेळाडूंच्या यादीत समावेश करण्यात आला आहे.भारत आणि इंग्लंड यांच्यात खेळल्या जात असलेल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यात, वेगवान गोलंदाज हर्षित राणालाही टीम इंडियाच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळाले, ज्यामध्ये त्याने आपल्या पदार्पणाच्या एकदिवसीय सामन्यात चमकदार कामगिरी केली आणि एकूण तीन विकेट घेतल्या. हर्षित राणासाठी गेले काही महिने चांगले गेले आहेत, ज्यात त्याला टीम इंडियासाठी तिन्ही फॉरमॅटमध्ये पदार्पण करण्याची संधी मिळाली आहे. यातील सर्वात खास पदार्पण टी-२० मध्ये होते, ते म्हणजे कन्कशन सबस्टीट्यूट जे आजपर्यंत चर्चेत आहे. आता त्यावर हर्षितने प्रतिक्रिया दिली आहे. हर्षित राणाचे कन्कशन सबस्टीट्यूट चाहत्यांमध्ये आणि क्रिकेट तज्ञांमध्ये चर्चेचा विषय बनले आहे. इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेपूर्वी खेळल्या गेलेल्या टी-२० मालिकेतील चौथ्या सामन्यात हर्षितचा संघात अचानक बदल म्हणून संघात समावेश करण्यात आला.यातील सर्वात खास पदार्पण टी-२० मध्ये होते, ते म्हणजे कन्कशन सबस्टीट्यूट जे आजपर्यंत चर्चेत आहे. आता त्यावर हर्षितने प्रतिक्रिया दिली आहे. हर्षित राणाचे कन्कशन सबस्टीट्यूट चाहत्यांमध्ये आणि क्रिकेट तज्ञांमध्ये चर्चेचा विषय बनले आहे. इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेपूर्वी खेळल्या गेलेल्या टी-२० मालिकेतील चौथ्या सामन्यात हर्षितचा संघात अचानक बदल म्हणून संघात समावेश करण्यात आला, ज्यामध्ये तो शिवम दुबेच्या जागी आला.

### मी अशा समस्यांकडे लक्ष देत नाही

अनेक माजी खेळाडूंनीही या बदलावर टीका केली होती, त्यावर आता हर्षित राणाचे वक्तव्य समोर आले आहे.हर्षित राणाने इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, “लोक नेहमीच बोलत राहतील. मी अशा समस्यांकडे अजिबात लक्ष देत नाही. माझे काम मैदानावर चांगले खेळणे आहे. जेणेकरून मी संघाच्या विजयात योगदान देऊ शकेन. हर्षित राणाने त्याच्या एकदिवसीय पदार्पणाच्या सामन्यात मिळालेल्या अनुभवाबद्दल सांगितले की, “हा फॉरमॅट थोडा कठीण आहे. कारण १० षटके गोलंदाजी करताना तुम्हाला वेगवेगळ्या प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागते. परंतु, आपण सातत्यपूर्ण चांगल्या सरावाने ते अधिक चांगल्या प्रकारे हाताळू शकतो.”भारतीय संघाकडून खेळणारा हर्षित राणा आता तिन्ही फॉरमॅटमध्ये पदार्पणाच्या सामन्यात तीन विकेट घेणारा टीम इंडियाचा पहिला गोलंदाज ठरला आहे

---

# जर चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी रोहितला सूर गवसला तर

## माजी भारतीय खेळाडू सुरेश रैनाचे हिटमॅनबद्दल मोठं वक्तव्य

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**टीम इंडियाचा माजी फलंदाज आणि सध्याचा क्रिकेट समालोचक सुरेश रैनाने दावा केला आहे की, जर रोहित शर्मा आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या आधी फॉर्ममध्ये आला तर आपल्याला चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये वेगळ्या प्रकारचा कर्णधार पाहायला मिळेल. याशिवाय पाकिस्तान आणि यूएईमध्ये खेळल्या जाणाऱ्या स्पर्धांमध्येही त्याचा दृष्टिकोन वेगळा असेल. रोहित शर्माला बऱ्याच दिवसांपासून धावा काढताना संघर्ष करत आहे.**



टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेला हिटमॅन रोहित शर्मा कसोटी आणि आता एकदिवसीय क्रिकेटमध्येही निस्तेज दिसत आहे.माजी डावखुरा फलंदाज सुरेश रैना जिओस्टारवर म्हणाला, “जर रोहित शर्माला चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी सूर गवसला तर आपल्याला वेगळ्या प्रकारचा कर्णधार पाहायला मिळेल. याशिवाय त्याचा दृष्टिकोनही वेगळा असेल.” रोहित शर्माला गेल्या १० डावांमध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २० धावांचा टप्पाही गाठता आलेला नाही. गेल्या २० डावांमध्येही त्याची सरासरी १० च्या आसपास राहिली आहे, जी त्याच्या आणि टीम इंडियासाठी चिंतेचा विषय आहे.रोहित शर्मने मायदेशात न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत आणि नंतर बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये फ्लॉप झाल्यानंतर रणजी सामन्यात प्रवेश केला. तिथे तो पहिल्या डावात फ्लॉप झाला, तर दुसऱ्या डावात त्याने काही झटपट धावा केल्या. अशा परिस्थितीत पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटमध्ये पुनरागमन केल्यानंतर त्याचा फॉर्म परत येईल, असे बोलले जात होते, मात्र तसे झाले नाही.

### सुरेश रैना काय म्हणाला?

पहिल्या सामन्यात त्याला 7 चेंडूत केवळ २ धावा करता आल्या. साकिब महमूदच्या चेंडूवर फ्लिक करण्याच्या प्रयत्नात बॅटच्या कडेवर चेंडू लागला आणि चेंडू हवेत उडाला, ज्यामुळे तो झेलबाद झाला. तो प्रचंड निराश होऊन पॅव्हेलियनमध्ये परतला. आता मालिकेतील उरलेल्या दोन सामन्यांमध्ये त्याची कामगिरी कशी होते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.टीम इंडियाचा माजी फलंदाज आणि सध्याचा क्रिकेट समालोचक सुरेश रैनाने दावा केला आहे की, जर रोहित शर्मा आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या आधी फॉर्ममध्ये आला तर आपल्याला चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये वेगळ्या प्रकारचा कर्णधार पाहायला मिळेल.